महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा घोडविंदे (एम.डी.)

रविवार ■ १९ ऑक्टोबर २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक : ११६ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये

# अंबरनाथमधील नाट्यमंदिराचे आज लोकार्पण



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**अंबरनाथः** अंबरनाथच्या नाट्यमंदिराचे लोकार्पण रविवार १९ ऑक्टोबर रोजी राज्याचे उप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या पाठपुराव्याने आणि पुढाकाराने उभारण्यात आलेल्या नाट्य मंदिराच्या उदघाटन समारंभाला भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, आमदार डॉ. बालाजी किणीकर तसेच मराठी कलाविश्वातील नामवंत दिग्दर्शक, अभिनेते आणि संगीतकार उपस्थित राहणार आहेत.

## नाट्य मंदिराला धर्मवीर आनंद दिघे यांचे नाव ?

नाट्य मंदिराला धर्मवीर आनंद दिघे यांचे नाव देण्यात येणार असून तशा आशयाचे बॅनर शिवसेनेच्या वतीने शहरात मोक्याच्या ठिकाणी लावण्यात आले आहेत. अंबरनाथ पश्चिमेतील सर्कस मैदान येथे उभारण्यात आलेल्या या नाट्यमंदिराच्या लोकार्पणानिमित्त पुढील आठ दिवस सुप्रसिद्ध नाटकांच्या विशेष प्रयोगांचे देखील आयोजन करण्यात आले आहे.

तर नाट्यगृहाच्या लोकार्पणाच्या दिवशी ज्येष्ठ अभिनेते भरत जाधव यांच्या सही रे सही या नाटकाच्या प्रयोगाचे आयोजन करण्यात आले आहे. ज्येष्ठ अभिनेते व दिग्दर्शक महेश कोठारे, महेश मांजरेकर, ज्येष्ठ संगीतकार अशोक पत्की, ज्येष्ठ अभिनेत्री उषा नाडकर्णी, अभिनेते विजय गोखले, अभिनेत्री अलका कुबल, अभिनेते व दिग्दर्शक विजय पाटकर, अभिनेते मकरंद अनासपुरे आदी उपस्थित राहणार आहेत. सिद्धार्थ जाधव, विशाखा सुभेदार आणि संतोष जुवेकर यांसारखे दिग्गज कलाकारही उपस्थित रहाणार आहेत.

# गांधारे पुलावर ८७ लाखाचा गुटखा जप्त

**शुक्रवारी पहाटे साडे पाच वाजण्याच्या दरम्यान गांधारे पूल भागातून एक आयशर टेम्पो धावत होता. पोलिसांनी त्यांना रोखले पण तो पुढे जाण्याचा प्रयत्न करू लागला. पोलिसांनी पाठलाग करून काही अंतरावर त्याला रोखले. आपण पोलीस जाळ्यात अडकलो याची जाणीव टेम्पोचा धनराज स्वामी याला झाली. पोलिसांनी टेम्पोची झडती घेतली. त्यात प्रतिबंधित गुटखा, तंबाखुजन्ट पदार्थाचा ८४ लाखाचा साठा होता. पोलिसांनी चालक स्वामीची चौकशी केली. त्याने दिलेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी चालक स्वामीसह इतर साथीदारांवर अन्न औषध प्रशासक मानक कायद्याने खडकपाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला.**

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** - दोन दिवसापूर्वी भिवंडी माणकोली उड्डाण पूल हद्दीत नारपोली पोलिसांनी ८४ लाखाचा गांजा तस्करांकडून पकडण्याची घटना ताजी असतानाच, कल्याण गुन्हे शाखेच्या पोलिसांनी शुक्रवारी पहाटे साडे पाच वाजता कल्याण पश्चिमेतील कल्याण पडघा रस्त्यावरील गांधारे पुलावरून गुजरातमधून तस्करीने आणलेला ८७ लाख ३७ हजार रूपयांचा गुटखा आणि प्रतिबंधित तंबाखुजन्य साठा जप्त केला आहे.

या तस्करी प्रकरणी खडकपाडा पोलिसांनी राजस्थान मधील रहिवासी असलेल्या धनराज रामगोपाल स्वामी याला अटक केली आहे. त्याने दिलेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी इतर त्याच्या तस्कर साथीदारांवर गुन्हा दाखल केला आहे. स्वामी हा राजस्थान राज्यातील लक्ष्मणगढ तालुक्यातील लालासी गावचा रहिवासी आहे. एका आयशर टेम्पोमधून स्वामी गुटखा आणि प्रतिबंधित तंबाखुजन्न वस्तू घेऊन गुजरातमधून कल्याणमध्ये येत होता.

गुजरात राज्यातून गुटखा आणि प्रतिबंधित तंबाखुजन्य वस्तू घेऊन एक आयशर टेम्पो कल्याण शहराच्या दिशेने निघाला आहे, अशी गुप्त माहिती कल्याण गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजित शिंदे यांना मिळाली होती. हा टेम्पो महामार्ग सोडून पोलिसांना चकवा देण्यासाठी अंतर्गत रस्त्यांवरून धावत असल्याची माहिती पोलिसांना होती. हा टेम्पो पडघा येथून गांधारे पूल मार्गे कल्याण शहरात येण्याची माहिती मिळाल्यावर वरिष्ठ निरीक्षक शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली कल्याणमधील गांधारे पूल येथे पोलिसांनी शुक्रवारी मध्यरात्रीपासून सापळा लावला होता.

कल्याणमधील श्वान निर्बिजीकरण केंद्रातील गैरकारभार; प्रकरणी ठेकेदार, नियंत्रक अधिकाऱ्याला नोटिसा, निलंबन आणि कठोर कारवाईचे उपायुक्तांचे आदेश

शुक्रवारी पहाटे साडे पाच वाजण्याच्या दरम्यान गांधारे पूल भागातून एक आयशर टेम्पो धावत होता. पोलिसांनी त्यांना रोखले पण तो पुढे जाण्याचा प्रयत्न करू लागला. पोलिसांनी पाठलाग करून काही अंतरावर त्याला रोखले, आपण पोलीस जाळयात अडकलो याची जाणीव टेम्पोचा धनराज स्वामी याला झाली. पोलिसांनी टेम्पोची झडती घेतली. त्यात प्रतिबंधित गुटखा, तंबाखुजन्य पदार्थाचा ८४ लाखाचा साठा होता.



# पुढील वर्षापासून चौथी आणि सातवीची शिष्यवृत्ती परीक्षा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई** : चालू शैक्षणिक वर्षापासून चौथी व सातवीच्या विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती परीक्षा घेण्यात येणार आहे. पूर्वी या परीक्षा पाचवी आणि आठवीमध्ये घेतल्या जात होत्या. नवीन व्यवस्थेनुसार चौथी व सातवी शिष्यवृत्ती परीक्षा एप्रिल-मे 2026 मध्ये रविवारी, तर जुन्या पद्धतीनुसार पाचवी-आठवी परीक्षेचे अंतिम आयोजन फेब्रुवारी 2026 मध्ये होईल. त्यानंतर 2026-27 या वर्षापासून कायमस्वरूपी चौथी-सातवी या स्तरावरच परीक्षा होणार आहेत.

पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा आणि पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेचा स्तर इयत्ता पाचवी ऐवजी इयत्ता चौथी आणि इयत्ता आठवी ऐवजी इयत्ता सातवी मध्ये करण्यास शासनाने मान्यता दिली आहे. शिष्यवृत्ती परीक्षेतील बदलाची अंमलबजावणी 2025-26 या शैक्षणिक सत्रापासून करण्यात येणार आहे.

इयत्ता चौथीसाठी प्रतिवर्षी पाच हजार रुपये तर इयत्ता सातवीसाठी प्रतिवर्षी सात हजार पाचशे रुपये शिष्यवृत्तीची रक्कम मंजूर करण्यात आली आहे. इयत्ता चौथी व इयत्ता पाचवीकरिता प्रत्येकी 16 हजार 693 आणि इयत्ता सातवी आणि इयत्ता आठवी करिता प्रत्येकी 16 हजार 588 शिष्यवृत्ती संच मंजूर राहतील. त्याचप्रमाणे यापुढे पूर्व उच्च माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा आणि पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेचे नाव प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ.चौथी स्तर) आणि उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. सातवी स्तर) असे करण्यात येणार आहे.

# वैद्यकीय अभ्यासक्रमासाठी २३०० जागा वाढल्या एकट्या महाराष्ट्राला १५० जागा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या २ हजार ६५० जागा वाढल्या. त्यानंतर आठवडाभरातच वैद्यकीय समुपदेशन समितीने (एमसीसी) आणखी २ हजार ३०० जागा वाढविल्या आहेत. वैद्यकीय अभ्यासक्रमासाठी २ हजार ३०० जागा वाढविण्यात आल्याचे समितीने शुक्रवारी जाहीर केले. नव्याने वाढविण्यात आलेल्या जागांमुळे महाराष्ट्राच्या वाट्याला १५० जागा आल्या आहेत. यामुळे लांबणीवर पडलेल्या तिसऱ्या फेरीसाठी तब्बल ४ हजार ९५० जागा उपलब्ध झाल्या आहेत. परिणामी, वैद्यकीय अभ्याक्रमासाठी अधिकाधिक विद्यार्थ्यांना प्रवेशाची संधी मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

रुग्णांच्या प्रमाणात डॉक्टरांची संख्या कमी असल्याने केंद्र सरकारने देशातील डॉक्टरांची संख्या वाढविण्यासाठी नवीन वैद्यकीय महाविद्यालये व जागा वाढविण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. त्यामुळे राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाने दरवर्षी किमान १५ हजार नव्या



जागा निर्माण करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार नवीन वैद्यकीय महाविद्यालयांना मान्यता देण्याबरोबरच कार्यरत महाविद्यालयांमध्येही जागा वाढविण्यास मान्यता देण्यात येत आहे. वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या तिसऱ्या फेरीपूर्वी राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाअंतर्गत असलेल्या वैद्यकीय समुपदेशन समितीने (एमसीसी) आठवडाभरामध्ये दोन वेळा नवीन महाविद्यालये व जागांना मान्यता दिली आहे. त्यामुळे देशभरामध्ये तिसऱ्या फेरीसाठी तब्बल ४ हजार ९५० जागा उपलब्ध होणार आहेत.

**एमसीसीने १० ऑक्टोबर रोजी देशभरामध्ये २ हजार ६५० जागा वाढविण्यात आल्याचे जाहीर केले होते. त्यापाठोपाठ १७ ऑक्टोबर रोजी पुन्हा २ हजार ३०० जागा नव्याने वाढविण्यात आल्याचे जाहीर केले. नव्याने वाढविण्यात आलेल्या या जागांमुळे देशातील वैद्यकीय अभ्यासक्रमांच्या जागांची संख्या १ लाख २९ हजार २५ इतकी झाली आहे. एमसीसीने तिसऱ्या फेरीचे वेळापत्रक लांबणीवर टाकल्याने विद्यार्थ्यांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले आहे. तिसऱ्या फेरीपूर्वी दोन टप्प्यांमध्ये वाढविलेल्या जागांचा तिसऱ्या फेरीमध्ये समावेश होणार आहे. त्यामुळे वैद्यकीय अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी अधिक जागा उपलब्ध होणार असून अधिकाधिक विद्यार्थ्यांना तिसऱ्या फेरीमध्ये प्रवेशाची संधी मिळणार आहे.**

## श्वान निर्बिजीकरण केंद्र गैरकारभार

# केडीएमसी उपायुक्तांचे कठोर कारवाईचे आदेश

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** - कल्याणमधील पत्रीपूल भागातील कल्याण कृषी उत्पन्न बाजार समिती जवळील कल्याण डोंबिवली पालिकेच्या श्वान निर्बिजीकरण केंद्रात अधिक प्रमाणात गैरकारभार आणि गैरव्यवहार सुरू असल्याच्या तक्रारींची गंभीर दखल आरोग्य मुख्यालयाने घेतली आहे. प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने आरोग्य विभागाचे उपायुक्त प्रसाद बोरकर यांनी श्वान निर्बिजीकरण केंद्राचे नियंत्रक बहुद्देशीय कर्मचारी कमलेश सोनवणे आणि या केंद्रातील श्वानांचे देखभालीचे काम करणाऱ्या पुणे येथील मे. जीवरक्षा ॲनिमल वेल्फेअर संस्थेला कारवाईच्या नोटिसा बजावल्या आहेत.

पालिकेच्या पत्रीपूल येथील श्वान निर्बिजीकरण केंद्रात मोठ्या प्रमाणात गैरकारभार आणि गैरव्यवहार सुरू असल्याच्या तक्रारी मागील अनेक वर्षांपासून कल्याण, डोंबिवली शहर परिसरातील प्राणी मित्र, माहिती कार्यकर्त्यांकडून पालिकेत करण्यात येत होत्या. या केंद्रातील गैरव्यवहाराची माहिती बाहेर येणार नाही याची काळजी यापूर्वीचे पालिका आरोग्य मुख्यालयातील कर्मचारी ठेकेदाराच्या साहाय्याने घेत होते.

**या तक्रारीच्या अनुषंगाने उपायुक्त बोरकर यांनी श्वान निर्बिजीकरण केंद्राचे पालिकेतील नियंत्रक बहुद्देशीय कर्मचारी (एम. पी. डब्ल्यु) कमलेश सोनवणे, देखभाल कंपनी मे. जीवरक्षा ॲनिमल वेल्फेअर यांना नोटिस बजावली आहे. प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने चोवीस तासात खुलासे करण्याचे आदेश दिले आहेत. लोकसत्ताने हे प्रकरण प्रथम बाहेर काढले होते. श्वान निर्बिजीकरण केंद्राची झाडाझडती सुरू असल्याने प्राणी प्रेमी नागरिकांमध्ये समाधान व्यक्त केले जात आहे. कमलेश सोनवणे यांना प्रशासनाने निलंबनाची तंबी दिली आहे. ठेकेदार कंपनीला अटीशर्तींचे पालन केले नाही म्हणून कठोर कारवाईचा इशारा देण्यात आला आहे.**

## लक्षवेधी

# परतीच्या पावसाने शेतकरी अजूनही चिंताग्रस्त

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे जिल्ह्यातील भिवंडी, पडघा, अंबाडी, मोहिली, पच्छापूर, दाभाड, खंबाळा, घोटगाव, अकलोली, गणेशपुरी, वडवली या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर भाताची लागवड झाली आहे. तालुक्यात यंदा सुमारे २३ हजार हेक्टर क्षेत्रावर भातशेती करण्यात आली आहे. ऑगस्ट-सप्टेंबरदरम्यान सातत्याने पडलेल्या पावसामुळे भातशेती पाण्याखाली गेली होती. उभे असलेले भातपीक आडवे झाल्याने मोठी नासाडी झाली. काही ठिकाणी करपा व बगळ्या रोगाचा प्रादुर्भावही दिसून आला. मात्र, कृषी विभागाच्या सल्ल्यामुळे शेतकऱ्यांना काही प्रमाणात दिलासा मिळाला. ऑक्टोबरच्या सुरुवातीला कापणीला सुरू होते; परंतु परतीच्या पावसामुळे वेळेवर कापणी होऊ शकली नाही. १५ ऑक्टोबरनंतर शेतकऱ्यांनी भातकापणी सुरू केली. किरवली राउत पाडा येथील शेतकरी शिवाजी राऊत म्हणाले, काही भागांत भात ओलसर असल्याने कापणी शक्य नाही; अनेक ठिकाणी कापणीसाठी भात कापून ठेवला आहे; मात्र ओलसर असल्यामुळे पीक खराब होण्याची शक्यता आहे, असे घोटगाव येथील राजू पाटील यांनी मोठ्या नुकसानाची माहिती दिली.



# ठाणे महापालिकेला तिसरे अतिरिक्त आयुक्त

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे, ता. १६ :** ठाणे, ता. १८ ठाणे महापालिकेच्या कामकाजाचा व्याप आणि शहराच्या झपाट्याने होणारा विकास लक्षात घेता, पालिकेत तिसरे अतिरिक्त आयुक्त पद निर्माण करण्यास प्रशासकीय सभेने मंजुरी दिली आहे. पालिकेच्या वाढत्या कामकाजाचा आणि शहराच्या विकासाच्या गतीचा विचार करून हा निर्णय घेण्यात आला. यामुळे प्रशासकीय कार्यक्षमता अधिक बळकट होणार असल्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

शहराच्या विस्ताराबरोबरच प्रकल्पांची संख्या आणि जबाबदाऱ्या वाढत असल्यामुळे, प्रशासनाने आणखी एक पद निर्माण करण्याचा प्रस्ताव सादर केला होता. पालिकेच्या विविध योजनांची अंमलबजावणी, नागरी सुविधा पुरवठा, नव्या प्रकल्पांच्या व्यवस्थापनासाठी अतिरिक्त अधिकाऱ्यांची गरज भासत असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे तिसरे अतिरिक्त आयुक्तपद निर्माण करून, महापालिकेच्या कामकाजाला अधिक गती देण्याचा उद्देश आहे. या प्रस्तावास महापालिकेच्या प्रशासकीय सभेने मंजुरी दिली असून, लवकरच या नव्या पदासाठी प्रक्रिया सुरू होणार आहे. दरम्यान, सध्याच्या घडीला ठाणे पालिकेच्या आस्थापनेवर सध्या दोन अतिरिक्त आयुक्त कार्यरत आहेत. यामध्ये संदीप माळवी (पदोन्नतीवर) आणि प्रशांत रोडे (प्रतिनियुक्तीवर) आहेत.

# भिवंडी तालुक्यात तीन हजार हेक्टर क्षेत्राचे पंचनामे पूर्ण

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी, ता. १८ (वार्ताहर)** राज्यातील मराठवाडा आणि विदर्भासह अनेक भागांत पडलेल्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. या अवकाळी पावसाचा फटका भिवंडी तालुक्यातील भातशेतीलाही बसला आहे. एकूण ९२५४ शेतकऱ्यांच्या ३०१६.५ हेक्टर क्षेत्राचे पंचनामे पूर्ण झाल्याची माहिती तहसीलदार अभिजित खोले यांनी दिली आहे. सरकारच्या आदेशानुसार महसूल विभाग, कृषी विभाग आणि पंचायत समिती यांच्या संयुक्त माध्यमातून पंचनामे करण्यात आले. कृषी विभागाने ४० गावांतील १५५४ शेतकऱ्यांच्या ४६३.६२ हेक्टर क्षेत्राचे पंचनामे केले. महसूल विभागाने ७३ गावांतील २९४० शेतकऱ्यांच्या ४९७.८८ हेक्टर शेतीचे पंचनामे केले, तर पंचायत समिती कर्मचाऱ्यांनी ११९ गावांतील ५७६० शेतकऱ्यांच्या २०५५.०० हेक्टर क्षेत्राचे पंचनामे पूर्ण केले. एकूण ३०१६.५० हेक्टर शेतजमिनीचे पंचनामे पूर्ण होऊन हा अहवाल सरकारकडे सुपूर्द करण्यात आला आहे. या शेतकऱ्यांना सरकारच्या निर्णयानुसार योग्य ती नुकसानभरपाई लवकरच देण्यात येणार असल्याची माहिती तहसीलदार खोले यांनी दिली.






# दिवाळी हा सण सर्वांचाच !

*दिवाळी ही सर्वांचीच आहे. परंतु दिवाळी हा सण हिंदूंचा असे समजून सर्वच धर्मीय दिवाळी साजरी करतांना निरसता दाखवतात. बौद्ध मंडळी या दिवशी मोगलायन व सारिपुत्तची हत्या झाली असा दाखला देवून दिवाळी हा काळा दिवस मानतात तर मुस्लीम लोकं अल्ला एकच आहे व तो या दिवशी जन्मला नाही असं कारण देत दिवाळी साजरा करणे टाळतात. ख्रिश्चन मंडळी येशू ख्रिस्ताच्या मृत्यूच्या तिथीला दिवाळी मानतात. तसं पाहिल्यास प्रत्येक धर्मातच दिवाळी आहे. दिवाळीचा अर्थच आनंद असा होतो. परंतु प्रत्येक धर्मात तिथ्या वेगवेगळया आहेत. शिवाय ही तिथीही हिंदू धर्मियांची नसेलच. कारण त्यांची तिथी वेगळी होती व ही तिथी शेतकऱ्यांची तिथी होती. म्हणूनच हा दिवस सर्व धर्मियांनी साजरा करण्यालायक तिथी आहे. ज्या ज्या धर्मात शेतकरी आहेत. हा केवळ हिंदूंचाच सण नाही. तो सर्व धर्मियांचाचच सण आहे. जो अखंड हिंदुस्थानात राहात असेल.*



**अंकुश शिंगाडे**
**नागपूर ९३७३३५९४५०**

दिवाळी हा सण नेमका कोणाचा. असा प्रश्न कुणालाही आज पडणार नाही. कारण आपल्या मनावर दिवाळी हा हिंदूंचा सण आहे, हेच कोरलं गेलेलं आहे आणि तो सण हिंदू धर्मीयच साजरा करतांना आपल्याला दिसत आहे. तो सण हिंदू धर्मीयच साजरा करीत आलेले आहेत आजतागायत. त्यामुळंच नेमका हा सण कोणाचा? याबाबतचा विचारच आपण कधी केलेला नाही.

अलिकडे दिवाळी हा सण साजरा होतोय आणि तो सण अगदी धुमधडाक्यात साजरा करण्याची एक प्रथा आहे. या दिवशी सर्व घरोघरी नंदादीप लावले जातात. घरासमोर रांगोळया काढल्या जातात. त्यानंतर फटाकेही फोडले जातात. परंतु हा सण नेमका कोणाचा आणि तो केव्हापासून अस्तित्वात आला असेल याचा विचारही केला जात नाही.

दिवाळी हा सण नेमका कोणाचा? असा प्रश्न उपस्थित केल्यास आतिशयोक्ती होईल. कारण या सणावर दावे प्रतिदावे नेहमीच चालत असतात. कधी या सणावर हिंदू धर्मीय दावे करतात. त्यासाठी इतिहास सांगतात तर कधी या सणावर बौद्ध धम्मीय लोकं दावे करतात व तेही हक्कं सांगत असतात. त्यामागे त्यांचा त्यांचा इतिहास आहे. हिंदूंचा इतिहास असा आहे की राम वनवासातून परत आले. ते परत आल्याने त्या दिवशी दिवाळी साजरी केली होती. म्हणूनच हा दिवाळी सण हिंदूंचा. परंतु यावर काही बौद्ध धर्मीय म्हणतात की राम हे वनवासातून वैशाख महिन्यात परत आले. त्यामुळंच हा सण त्यांचा नाही. तो सण आमचा आहे. कारण आमचे भदंत पावसाळ्याच्या आजारांचे प्रमाण जास्त असल्यानं स्वतःला तीन महिनेपर्यंत गृहेत वा लेणीत स्वतःला बंदिस्त करुन ठेवत. आजार त्यांना शिवू नये म्हणून. त्यात ते उपास तापासही ठेवत नव्हे तर त्या वर्षावासाच्या काळात सतत पाऊस पडत असल्यानं व अन्न मिळविण्यासाठी पुरेशी सोय नसल्यानं उपास तापासही घडत. त्यातच चार महिने पावसाळा असायचा. त्यानंतर वाऱ्याची दिशा बदलायची व परतीचा पाऊस सुरु व्हायचा. त्याचा अंदाज बौद्ध भिख्खूंना यायचा. त्यातच असा अंदाज आलाच की ते विशिष्ट अशी तिथी पाहून बाहेर पडत. ते ज्या दिवशी बाहेर पडत. त्याच्या आधीच्या दिवशी तीच मंडळी एक प्रकारचा मोठ्या प्रमाणात उत्सव साजरा करीत असत. त्याला दिवाळी असे म्हणत. त्यानंतर ते धम्म प्रसारासाठी बाहेर पडत व तो उत्सव कोजागिरी पौर्णीमेला साजरा होत असे. ही त्यांची दिवाळीच असे.

हिंदू मात्र खऱ्या अर्थानं दिवाळी गुढी पाडव्यालाच साजरी करायचे. त्या दिवशी ते गुढी उभारायचे. त्याचं कारण होतं, हिंदू धर्माचं पित्तरांना मानणं. ते पित्तरं निराश होवू नये म्हणून गुढी उभारली जायची व तो सण अतिभव्य प्रमाणात हिंदू धर्मीय साजरे करीत असत. त्याला गालबोट लागलं संभाजी महाराजांच्या हत्येनं. मुघलांनी पाहिलं की हिंदू लोकं गुढीपाडवा जोमानं साजरा करतात. तेव्हा हा सण त्यांनी साजरा करु नये म्हणून त्यांनी संभाजी महाराजांची त्याच दिवशी रात्रीला हत्या केली व त्यांचं मस्तक त्याच दिवशी गुढी रुपात भाल्यावर सजवलं व हिंदूंचा दिवाळी म्हणून साजरा होणारा सण नष्ट केला.

दिवाळी ही हिंदूचीही साजरी होत असे व दिवाळी ही बौद्धांचीही साजरी होत असे. मात्र त्यांच्या तिथ्या वेगवेगळया होत्या. मग हीच दिवाळीची तिथी हिंदूंनी का घेतली असेल यामागे कारणमिमांसा आहे व हा सण नेमका कोणाचा? हे सुद्धा आज अज्ञात स्वरुपात आहे आणि विचार करणारा प्रश्न आहे.

या सणाबाबत सांगायचं झाल्यास हा सण तसं पाहिल्यास व सखोल विचार केल्यास शेतकऱ्यांचा आढळून येतो. माणूस झाडावरुन जेव्हा खाली आला आणि तो शेती करु लागला हे सर्वांनाच माहीत आहे व ही गोष्ट डार्वीनचा उत्क्रांतीवाद सांगतोच. त्यातच त्याहीवेळेस भारताला भारत जरी नाव नसलं तरी भारत असेलच ही शक्यताही नाकारता येत नाही. तसं पाहिल्यास दिवाळी हा सण आपल्याच भारतात आणि त्यावेळच्या हिंदुस्थानात साजरा होत असेलच. ज्या अखंड हिंदुस्थानात सर्वदूर हिंदू धर्म किंवा बौद्ध धर्म नसेलच. मग कोणाचं राज्य असेल बरे? ते राज्य होतं शेतकरी वर्गाचं.

*हीच तिथी का?*

ज्यावेळेस भारत अस्तित्वातही नव्हता आणि ज्यावेळेस धर्मही अस्तित्वात नव्हता. त्यावेळेसही हा सण साजरा होत असे. अन् तो त्या काळानुसार साजरा केल्या जात असे. मग हीच तिथी तो सण साजरा करण्याची होती काय? असाही एक प्रश्न आपणाला पडू शकतो. तर याचं उत्तर होय असंच येईल. यापुर्वीच्या चार महिन्याच्या काळात भारतात म्हणजेच अखंड हिंदुस्थानात जुन ते सप्टेंबर पावसाळा असायचा. सतत पाऊस पडायचा. ज्यात अतिवृष्टीनं शेतकऱ्यांचं अतोनात नुकसानही व्हायचं. तरीही काही माल शेतात उरायचंच. त्यातच पाऊस संपला की शेतकरी वर्ग ते धान्य कापायचे व त्याला मार्गी लावून धान्य काढायचे. त्यातील राशी घरी भरल्या जात असत. अशातच त्या राशी घरात भरल्या गेल्या की एक दिवस निवडायचे. त्या दिवशी त्या राशीच्या सन्मानार्थ नाचगाणे करायचे. पर्यायानं सांगायचं झाल्यास उत्सव साजरा करायचे. ज्यात उत्सव साजरा करतांना त्यात घराची साफसफाई करायचे. त्यात उद्देश होता. घरात जे जीवजंतू आहेत. ते बाहेर पडायला हवेत. ज्यापासून धान्याला नुकसान आहे. पुढं चुनखडकाचा शोध लागल्यानंतर चुना मारण्याची पद्धत रुढ झाली. ज्यात चुना मारल्यावर धान्याला किड्यापासून व मुंग्यांपासून वाचवता येत असे.

हा मुळचा शेतकऱ्यांचा सण. दिवाळी आणि होळी हे दोन्ही सणं शेतकऱ्यांचेच. पहिला सण खरीप पिके घरी आणल्यावर साजरा केल्या जायचा तर दुसरा सण रब्बी पिकं हातात आल्यावर साजरा केल्या जायचा. त्याला तिथ्या नव्हत्याच. त्यानंतर पुढं जेव्हा धर्म स्थापन झाला. त्या त्या धर्मानुसार तथाकथीत लोकांनी शेतकरी वर्गाचं काहीच चालू दिलं नाही आणि आपली मक्तेदारी स्थापन केली. कृषक वर्गाचं दिवाळी आणि होळी सणाबाबत अस्तित्वच समाप्त करुन टाकलं आणि आपलं अस्तित्व निर्माण केलं व दावेदारी ठोकली. दिवाळी हा सण आमचाच.

मौर्य साम्राज्याच्या अस्तापर्यंत दिवाळी सणाची स्थिती ठीकच असेल. दिवाळी हा सण हिंदू वर्गीय लोकं उन्हाळयातच साजरा करीत असतील तर कोजागिरी पौर्णिमेला वर्षावास संपल्यानंतर बौद्ध धर्मीय लोकं दिवाळी सण साजरा करीत असतील. कारण दिवाळीचा मुळात अर्थ आनंद असा तथाकथीत लोकांनी घेतला. दिवाळी साजरी करायची म्हणजेच आनंद साजरा करायचा. असंच ठरल्यानं जेव्हा धर्म स्थापन झाले. तेव्हा प्रत्येक धर्माची दिवाळी वेगवेगळीच होती. असं जर होतं तर दिवाळीची ही तिथी हिंदूंची तिथी म्हणून का अस्तित्वात आली? असाही एक प्रश्न उपस्थित होतो. त्याचं कारण आहे, त्या काळातील वाद. त्याही काळात धर्माधर्मांचे वाद व्हायचे. आताच्या काळात जसे कधीकधी हिंदू मुस्लीम वाद होतात तसे. त्याही काळात वैदिक धर्म व बौद्ध धर्म वैदिक धर्म व जैन धर्म असे वाद व्हायचे. प्रत्येक धर्मीय माणसांना एकमेकांचे आचार विचार पटायचे नाहीत. पचायचेही नाहीत. मग वाद व्हायचे. त्यातच हत्याही. ज्यात राजा बृहद्रथच्या हत्येनंतर येथे राजपद धारण केलेल्या पुष्यमित्र श्रृंग घराण्यानं वैदिक धर्माला राजाश्रय दिला. कारण तो वैदिक धर्माचा पुरस्कर्ता होता व त्याच्याच राज्यात कितीतरी बौद्ध भिख्खूंची हत्या करण्यात आली. त्यातच गौतम बुद्धाच्या अगदी जवळचे असलेले शिष्य मोगलायन व सारीपुत्त यांचीही हत्या करण्यात आली व तो दिवस एक आनंद उत्सव म्हणून साजरा करण्यात आला. त्याला दिवाळी असं नाव देण्यात आलं. त्यानंतर परंपराच पडली की हाच दिवस दिवाळी म्हणून साजरा करायचा.

दिवाळीची ही तिथी मुळची शेतकरी वर्गाची तिथी होती. शेतीतून आलेल्या धान्यावर आनंद व्यक्त करण्यासाठी निर्माण करण्यात आलेली तिथी. म्हणतात ना की दोघांचं भांडण व तिसऱ्याचा लाभ. परंतु यामध्ये दोघांचं भांडण झालं व तिसऱ्याचं नुकसान. वैदिक आणि बौद्ध धर्मियांचं भांडण. ज्यातून शेतकऱ्यांच्याच तिथीच्या दिवशी हत्या आणि मग परंपरा. आज दिवाळी म्हणून साजरी होत असलेली शेतकऱ्यांची तिथी मिटली नव्हे तर मिटवली गेली आहे आणि त्या जागेवर विशिष्ट अशा धर्मानं बाजी मारत आपली तिथी बनवली आहे. त्यानंतर ती बौद्ध धर्मीय लोकांची तिथी नव्हतीच. म्हणूनच त्यांनी त्यावरचे दावे करणे सोडून दिले आहे. शेतकरीही चूप बसले आहे. कारण त्यांना दिवाळीशी व तिथीशी काही घेणंदेणं नव्हतं आणि नाही. शिवाय ते अज्ञानी देखील होते. शिवाय त्या शेतकरी वर्गातील बरेचसे शेतकरी वैदिकच होते. तद्नंतर त्यात लक्ष्मी, कुबेर, गणपती शिरवल्या गेलीत. तद्नंतर रामालाही शिरवल्या गेलं. ज्यांचा या दिवाळीशी दूरचाही संबंध नव्हता. पुढं जेव्हा या भारतात मुस्लीम समुदाय आला व हिंदूंच्या हत्या करण्यात आल्या. तेव्हा या सणाला अधिक महत्व निर्माण झालं व घरोघरी हिंदू समुदाय मुस्लीम राजवटीतही मोठ्या प्रमाणात हा सण साजरा करु लागले. त्यानंतर इंग्रज आले व त्यांना हाकलून देण्यासाठी व हिंदूंना एकत्र करण्यासाठी या सणाची महती आणखीनच वाढली. त्याचं कारण होतं, असा सण साजरा करुन आपल्या धर्माबाबत लोकांच्या मनात आत्मीयता निर्माण करणं.

महत्वाचं सांगायचं झाल्यास आज दिवाळी साजरी होतोय हिंदूंचा एक सण म्हणून. त्याचं पावित्र्य जपलं जातं. घरोघरी आनंद सोहळा असतो. तोरणे, पताका लावल्या जातात. त्यातच हा सण हिंदूंचाच सण आहे असं गृहीत धरलं जातं. परंतु तो हिंदूं नावाच्या एकाच धर्माचा सण नाही तर तो सर्व धर्मियांचाच सण आहे. ज्या ज्या धर्मात कृषक वर्ग आहे.

आज शेतकरी कोणत्या धर्मात नाहीत. हिंदू, मुस्लीम, बौद्ध, जैन, शिख, पारशी, ख्रिश्चन या सर्व धर्मात शेतकरी आहेत व पर्यायानं सांगायचं झाल्यास हा सण त्या सर्वांनीच साजरा करायला हरकत नाही. परंतु हा सण साजरा करतांना ती मंडळी बंधन पाळतात. कोणी म्हणतात की दोन बौद्ध भिख्खू त्याच दिवशी मारले गेले. असे बोलून समाजात तेढ निर्माण केली जाते. असे जर आहे तर ज्या दिवशी धर्मवीर संभाजीची हत्या केली. तो गुढीपाडवा होता. तो सण हिंदू धर्मीय साजरा करतात की नाही.

हत्या त्या काळात ह्या होणारच होत्या. त्याचं कारण होतं त्या काळात एकमेकांचे विचार न पटणं. कधी धर्मावरुन वाद व्हायचे व हत्या केली जायची. मग हत्या करतांना तिथी व दिवस पाहिल्या जात नव्हता. आजही हत्या केल्याच जातात अशाच कुविचारातून. उदाहरणार्थ ज्या दिवशी मुंबईत बॉम्बस्फोट झाला. ती तारीख होती २६/11. संविधान बनल्याची तारीख. याचा अर्थ तो काळा दिवस पाळून संविधान दिवस म्हणून ती तारीख साजरी करु नये काय? करायलाच पाहिजे. हत्या करणाऱ्यांना धडा शिकविण्यासाठी. हे जरी खरं असलं तरी आपण तो मुद्दा थोडासा बाजूला ठेवून व समाजातील दिवाळीबाबतची थोडीशी कलुषता बाजूला ठेवून, सर्व धर्मीयांनी हा सण सर्व मिळून गुण्यागोविंदानं साजरा करायला हवा. दिवाळी हा हिंदूचा सण म्हणून नाही तर तो शेतकऱ्यांचा सण आहे असं मानून. तेव्हाच आपण सहिष्णू आहोत याचा परीचय देता येईल. भारत आपला आहे. तो शेतकऱ्यांचा आहे तेवढाच तो सर्व धर्मियांचाही असून दिवाळी साजरी करण्याचा सर्वांनाच हक्कं आणि अधिकार आहे. त्यामुळंच त्यांनीही दिवाळी हा सण नेमका एका विशिष्ट धर्माचाच असं म्हणून वा मानून दिवाळी या सणाचा अपमान करु नये तर तो साजरा करुन दिवाळी या सणाचं महत्व वाढवावं. जेणेकरुन आपण आपला धर्माबाबत कितीही वाद असला तरी देशांतर्गत कोणताच वाद नाही हे सिद्ध होईल व आपली एकजुटता दिसेल व आपल्या एकतेचाही परीचय देता येईल हे तेवढंच खरं, यात शंका नाही.

# दिवाळी अंक म्हणजे पर्वणीच



आपल्या देशात दिवाळी हा सण मोठ्या उत्साहात साजरा करतात. आताही देशात दिवाळीची धामधूम सुरू आहे. वेगवेगळया वस्तूंच्या खरेदीसाठी बाजारपेठा फुलल्या आहेत. सर्वत्र दिवाळीच्या खरेदीची धामधून सुरू आहे. आकाशकंदील, मिठाई, फटाके, नवीन कपडे, नवीन वाहने, इलेक्ट्रॉनिक वस्तू यांच्या खरेदीसाठी दुकाने फुलून गेली आहेत. दिवाळीमुळे सर्वांच्या उत्साहाला उधाण आले आहे. दिवाळी म्हंटले की गोडाआधोडाचा फराळ, आकाशकंदील, पणत्या, नवीन कपडे, नवीन वस्तू असे जे समीकरण आहे तसेच दिवाळी म्हणजे दिवाळी अंक असेही समीकरण आहे.

दिवाळी आली की वाचकांना वेध लागतात ते दिवाळी अंकाचे आणि वाचकांचे पाय आपसूकच दिवाळी अंकाच्या खरेदीसाठी पुस्तकांच्या दुकानाकडे वळतात. महाराष्ट्रात तर दिवाळी अंकाची परंपरा खूप पूर्वीपासून आहे. महाराष्ट्रात पहिला दिवाळी अंक १९०९ साली प्रसिद्ध झाला होता. त्याचे नाव मनोरंजन असे होते. पहिला दिवाळी अंक प्रसिद्ध होऊन आज ११६ वर्ष झाली आहेत. आपल्या राज्यात दरवर्षी विविध विषयांवरील दर्जेदार दिवाळी अंक प्रसिद्ध होतात. महाराष्ट्रात जवळपास हजाराच्या आसपास दिवाळी अंक प्रकाशित होतात. दरवर्षी त्यात नव्या अंकाची भर पडतेच. दिवाळी अंक म्हणजे वाचकांसाठी मेजवानीच. कला, क्रीडा, साहित्य, राजकारण, अर्थकारण, विनोद, कथा, कादंबरी, कविता, सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य, आहार, व्यंगचित्र, भविष्य, चित्रपट, नाटक अशा विविध विषयांवरील दिवाळी अंक वाचणे म्हणजे पर्वणीच. अनेक वृत्तपत्रे आपल्या वाचकांसाठी दिवाळी अंक काढत असतात. यावर्षीही अनेक वृत्तपत्रांनी आपल्या वाचकांसाठी दिवाळी अंक काढले आहेत. फटाके, मिठाई, फराळ यासोबतच दिवाळी अंक ही सुशिक्षित आणि साहित्यप्रेमी घरांसाठी एक आवश्यक घटक आहे.

मधल्या काळात दिवाळी अंकांना घरघर लागली होती. कोरोना काळात दिवाळी अंकाच्या छपाई आणि वितरणाला मर्यादा आल्या होत्या. त्यामुळे तुलनेने कमी दिवाळी अंक प्रसिद्ध झाले होते. असे असली तरी काही संपादकांनी आणि प्रकाशकांनी आपले अंक ऑनलाईन प्रसिद्ध केले होते. वाचकांना ते डिजिटल प्लॅटफॉर्म वर उपलब्ध झाले होते. काहींनी आपले अंक पीडीएफ स्वरूपात उपलब्ध करून दिले होते. वाचकांनी त्याची प्रिंट काढून ते वाचले होते.

कोरोनाचे दुष्चक्र संपल्यानंतर दिवाळी अंकांना पुन्हा सुगीचे दिवस आले. यावर्षी अनेक संपादकांनी आणि प्रकाशकांनी आपले दिवाळी अंक वाचकांसाठी उपलब्ध करून दिले आहेत. काहींनी ऑडिओ आणि व्हिज्युअल दिवाळी अंकही बाजारात आणले आहेत. वाचक पूर्वीच्याच उत्साहाने दिवाळी अंकाचे स्वागत करीत आहे.

दिवाळी अंक आपल्या साहित्य संस्कृतीचा एक अविभाज्य भाग आहे. दिवाळी अंकामुळे वाचन संस्कृती रुजायला खूप मदत झाली आहे. वाचन संस्कृती रुजवण्यात आणि नव्या पिढीला वाचन संस्कृतीकडे घेऊन जाण्यात दिवाळी अंकांचा मोलाचा वाटा आहे. यावर्षी आपण आपल्या नातेवाईकांना आणि मित्र परिवाराला दिवाळीच्या शुभेच्छा आणि फराळासोबत दर्जेदार दिवाळी अंक भेट द्यावीत. वाचनाची गोडी वाढवण्यासाठी दिवाळी अंक हा चांगला मार्ग आहे. गोडाधोडाच्या फराळासोबतच वाचनाचा हा फराळही दिला तर दिवाळीची गोडी आणखी वाढेल आणि वाचन संस्कृती टिकायलाही मदत होईल.

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# शाळांमधील सुविधांसाठी सीएसआर निधीचा उपयोग व्हावा

## - शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई** : राज्यात एक लाखांहून अधिक शाळांमधून दोन कोटींपेक्षा अधिक विद्यार्थी शालेय शिक्षण घेतात. या विद्यार्थ्यांना राष्ट्र प्रथम या संकल्पनेवर आधारित गुणवत्तापूर्ण आणि आनंददायी शिक्षण दिले जाते. शासनाच्या माध्यमातून शाळांमध्ये विविध सोयी सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. याचबरोबर विविध उद्योग सामाजिक उत्तरदायित्व निधीच्या (सीएसआर) माध्यमातून देखील सहकार्य करतात. यामध्ये सुसूत्रता आणून शाळा आणि विद्यार्थ्यांच्या गरजेनुसार हा निधी वापरला जावा, असे आवाहन शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी केले.

आपण समाजाचे देणे लागतो या भावनेतून अनेक उद्योग सीएसआर निधीच्या माध्यमातून शाळा आणि विद्यार्थ्यांना सहकार्य करतात. यामध्ये सुसूत्रता येण्याच्या उद्देशाने विविध उद्योगांच्या सीएसआर प्रमुखांशी शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेच्या कार्यालयात झालेल्या बैठकीत संवाद साधला. शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजितसिंह देओल, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेचे राज्य प्रकल्प संचालक संजय यादव, उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे सहसचिव डॉ. संतोष भोसले, शालेय शिक्षण विभागाचे उपसचिव तुषार महाजन यांच्यासह विविध उद्योगांचे सीएसआर प्रमुख यावेळी उपस्थित होते.

राज्य शासन विद्यार्थी केंद्रबिंदू मानून विविध योजना आणि उपक्रम राबवित आहे. शाळांमध्ये शिक्षकांबरोबरच, पिण्याचे शुद्ध पाणी, स्वच्छ स्वच्छतागृहे, चांगल्या इमारती, प्रयोगशाळा आदी सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. यांसह विद्यार्थ्यांच्या आणि शाळांच्या गरजा लक्षात घेऊन विद्यांजली पोर्टलवर अधिक माहिती उपलब्ध करून दिली जाते. विद्यार्थ्यांना अधिक सोयी सुविधा उपलब्ध व्हाव्यात यादृष्टीने उद्योगांनी या गरजांचा विचार करून आपले योगदान द्यावे, असे आवाहन शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी केले.

प्रधान सचिव रणजितसिंह देओल यांनी यावेळी उद्योगांच्या सहकार्याने राज्यात सीएसआरचा निधी उपलब्ध होत असल्याचे सांगितले. 'यूडायस'च्या माध्यमातून आणि केंद्र सरकारच्या 'विद्यांजली' पोर्टलवर राज्यातील सर्व शाळा आणि विद्यार्थ्यांशी संबंधित माहिती उपलब्ध असून शाळांच्या गरजा लक्षात घेऊन हा निधी योग्य ठिकाणी खर्च व्हावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. 'विद्यांजली' पोर्टलवर शाळांच्या मागणीची नोंदणी होत असून त्या माहितीचा सीएसआरच्या योग्य नियोजनासाठी उपयोग होईल, असे त्यांनी सांगितले. राज्य शासनाने 'दत्तक शाळा योजना' जाहीर केली असून उद्योगांनी या माध्यमातून शाळा दत्तक घेतल्यास शाळांच्या नावासोबत उद्योगाचे नाव जोडले जाईल, याबाबतही त्यांनी माहिती दिली.

शालेय शिक्षण विभागाच्या वतीने सादरीकरणाद्वारे राज्यातील शालेय शिक्षणाची सद्यस्थिती, सीएसआरमधून सुरू असलेले उपक्रम, कोणत्या उपक्रमांमध्ये सहकार्याची आवश्यकता आहे आदींबाबत माहिती देण्यात आली. त्याचप्रमाणे सीएसआर प्रमुखांनी ते कोणत्या क्षेत्रात काम करू इच्छितात, याबाबत माहिती दिली. सीएसआर प्रमुखांना एका व्यासपीठावर आणून निधीच्या योग्य वापरासाठी विचारांची देवाणघेवाण होत असल्याबद्दल सर्वच सीएसआर प्रमुखांनी शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे आणि शासनाचे आभार मानले.

जीवनदीप महाविद्यालय गोवेली ता. कल्याण
मुंबई विद्यापीठाशी संलग्न, नॅक मूल्यांकन प्राप्त
प्रवेश सुरू (२०२५•२६)
पदवी नंतर पत्रकारितेत करिअर करण्याची सुवर्णसंधी
एम.ए (एमसीजे)
(मास्टर ऑफ जर्नालिझम अँड मास कम्युनिकेशन)
-पात्रता-
कोणत्या शाखेतून पदवी उत्तीर्ण
- करिअर व्यवसाय व नोकरीची संधी -
टीव्ही चॅनेल्स, वृत्तपत्र, मॅक्झिन, रेडिओ, वेब मीडिया, जनसंपर्क, जाहिरात, चित्रपट निर्मिती, डिजिटल मीडिया या क्षेत्रांमध्ये संधी .
- प्रवेशासाठी संपर्क -
९४२१०५९३९६
goveli_jssp@rediffmail.com
www.jeevandeepcollegegoveli.in




**मेष**
तुम्हाला जे काही लोकांना पटवून द्यायचे आहे, ते तुम्ही सहजतेने मान्य करू शकता. तुमचा अधिकार गाजवण्याच्या तुमच्या प्रवृत्तीवर नियंत्रण ठेवा.

**वृषभ**
तुमच्या व्यवसायात जास्त फायदा होईल.नोकरीसाठी चांगली बातमी मिळू शकते. तुम्हाला एखाद्या कंपनीत मुलाखतीसाठी बोलावले जाऊ शकते.

**मिथुन**
वैवाहिक जीवनात आनंद राहील.एखाद्या नातेवाईकाशी वाद झाला असेल तर संबंध सुधारण्यासाठी आजचा दिवस चांगला आहे.

**कर्क**
सहलीला जाताना आपल्या आवश्यक वस्तू घेऊन जायला विसरू नका. आज तुम्हाला तुमच्या आरोग्याबाबत सावध राहावे लागेल.

**सिंह**
तुमच्या कामावर परिणाम होऊ शकतो. या राशीच्या लोकांना आज जवळच्या व्यक्तीकडून चांगली बातमी मिळू शकते.कोणताही निर्णय काळजीपूर्वक घ्या.

**कन्या**
नवोदित लेखकांसाठी दिवस चांगला असू शकतो. तुमची कारकीर्द आता पूर्णपणे नवीन रूप घेईल.कुटुंबासोबत रिअल इस्टेट खरेदी करण्याची योजना करू शकता.

**तूळ**
आज तुमचे विरोधक तुमच्यापासून दूर राहतील. एखाद्या जुन्या मित्राला त्याच्या घरी भेटायला जाऊ शकता. विद्यार्थ्यांना यश मिळण्याची शक्यता आहे.

**वृश्चिक**
आज कोणतेही काम करताना मन शांत ठेवल्यास तुमच्या कामात सहज यश येईल. आपण घाई केल्यास, सर्वकाही चुकीचे होईल.

**धनु**
प्रेमी युगुलांसाठी आजचा दिवस चांगला जाणार आहे.तुमच्या सर्जनशील कार्यात प्रसिद्ध व्हाल आणि तुम्हाला प्रसिद्धीही मिळेल. तुम्ही यशस्वी व्हाल.

**मकर**
आर्थिक लाभ होण्याची अपेक्षा आहे.बोलण्यापूर्वी विचार करा, अन्यथा करार होण्यापूर्वीच रद्द होईल.जे बेरोजगार आहेत त्यांना रोजगार मिळण्याची शक्यता आहे

**कुंभ**
तुमचे आरोग्य उत्तम राहील. तुमच्या प्रियजनांकडून भेटवस्तू मिळेल.कोणाच्याही कामावर मत देणे टाळा आणि इतरांशी बोलताना योग्य भाषेचा वापर करा.

**मीन**
या राशीचे जे आज अविवाहित आहेत त्यांच्यासाठी नातेसंबंध येऊ शकतात. कुटुंबातील सदस्य तुमच्या लग्नाचे नियोजन करतील.

नियमित वाचा दैं. ठाणे जीवनदीप वार्ता

# ठाणे महापालिकेच्या सेवेत २५ कर्मचाऱ्यांना वारसा हक्काने कायम नियुक्ती



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** वारसा हक्काने ठाणे महापालिकेच्या सेवेत लागलेल्या २५ कर्मचाऱ्यांना नुकतीच कायम नियुक्ती देण्यात आली. जानेवारी २०२५ पासून आतापर्यंत वारसा हक्काच्या एकूण ३०० जणांना महापालिकेच्या सेवेत कायम करण्यात आले आहे. दिवाळीच्या पार्श्वभूमीवर नियुक्ती पत्रे मिळाल्याने महापालिका कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निर्देशानुसार, महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या मार्गदर्शनात आस्थापना विभागाने विशेष मोहीम राबवून ही नियुक्ती प्रक्रिया पूर्ण केली आहे.

लाड-पागे समितीच्या शिफारशींच्या अनुषंगाने जे सफाई कर्मचारी सेवानिवृत्त किंवा स्वेच्छानिवृत्त होतात त्यांच्या वारसांना महापालिकेच्या सेवेत नियुक्ती देण्यात येते. अशी नियुक्ती देण्यात आलेल्या सफाई कर्मचाऱ्यांची तीन वर्षांची सेवा पूर्ण झाल्यावर त्यांना महापालिकेच्या सेवेत कायम केले जाते.

आस्थापना विभागातील सर्व कर्मचाऱ्यांनी विशेष मोहीम घेऊन कागदपत्रांची पूर्तता करून घेतली. कर्मचाऱ्यांच्या वारसांना सामावून घेण्यासाठी अत्यंत पारदर्शीत पध्दतीने भरती प्रक्रिया करण्यात आली आहे. या वारसांपैकी, महापालिकेच्या सेवेत वर्ग ३ चे १ व वर्ग ४ चे २४ अशा एकूण २५ कर्मचाऱ्यांची नियुक्ती पत्रे देण्यात आली. यापैकी काही पत्रे प्रातिनिधिक स्वरूपात नुकतीच महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या हस्ते देण्यात आली. त्याप्रसंगी, अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, उपायुक्त (मुख्यालय) जी. जी. गोदेपुरे, कार्मिक अधिकारी दयानंद गुंडप, आस्थापना अधिक्षक रश्मी कांबळी आदी उपस्थित होते.

आतापर्यंत, ठाणे महानगरपालिकेच्या सेवेत वर्ग ३ चे ४७ व वर्ग ४ चे २५३ अशा एकूण ३०० कर्मचाऱ्यांची वारसा हक्काने नियुक्ती करण्यात आलेली आहे.

# "एल्डर लाईन" 14567- ज्येष्ठांसाठी मदतीचा आधार

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** जनसेवा फाउंडेशन, पुणे यांच्यामार्फत जेष्ठ नागरिकांसाठी 14567 राट्रीय हेल्पलाईन ही सेवा महाराष्ट्रात राबवली जाते. "मानवसेवा हीच ईश्वर सेवा" हे ब्रीद वाक्य घेऊन संस्थापक अध्यक्ष डॉ.विनोद शहा (MD) यांच्या मार्गदर्शनाखाली जनसेवा फाऊंडेशन, पुणे गेल्या 37 वर्षापासून सातत्याने आपल्या विविध प्रकल्पांद्वारे गरीब, आजारी, वृद्ध, अपंग, निराधार, गरीब मुले मुली आणि महिला यांची सेवा करीत आहेत. जनसेवा फाउंडेशनला सयुक्त राष्ट्रसंघाचा विशेष दर्जा प्राप्त आहे.

**महाराष्ट्रातील अंमलबजावणी:** ऑगस्ट 2021 पासून सुरू झालेल्या या 14567 राष्ट्रीय टोल-फ्री हेल्पलाईनवर आतापर्यंत 4 लाखांहून अधिक कॉल्स आले असून 30 हजारांहून अधिक प्रकरणांमध्ये क्षेत्रीय पातळीवर प्रत्यक्ष मदत करण्यात आली आहे.

**हेल्पलाइनद्वारे मिळणाऱ्या मोफत प्रमुख सेवा:**

- **माहिती:** आरोग्य, पोषण, निवारा, आश्रयगृह व वृद्धाश्रम, डे केअर सेंटर, याबाबत माहिती.
- **मार्गदर्शन:** कायदेविषयक, मालमत्ता व कौटुंबिक वादांमध्ये मोफत कायदेशीर सल्ला, पेन्शन योजना, ज्येष्ठ नागरिकांसाठी चरितार्थ व कल्याणासाठी अधिनियम 2007.
- **भावनिक आधार** – मानसिक आजार व चिंता, ताण, राग इत्यादी व्यवस्थापन.
- बेघर व अत्याचारग्रस्त वृद्धांसाठी मदत आणि पुनर्वसन, कुटुंबीयांशी संवाद, पोलिस प्रशासनाशी समन्वय, समुपदेशन."एल्डर लाईन 14567" ही केवळ हेल्पलाईन नाही तर ज्येष्ठ नागरिकांसाठी एक विश्वासाचा हात, एक सुरक्षित आधार आहे. या माध्यमातून वयोवृद्धांच्या गरजा समजून घेतल्या जातात आणि त्यांना सन्मानाने जगता येईल यासाठी आवश्यक ती मदत दिली जाते. ज्येष्ठांसाठीची ही सेवा अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचावी यासाठी समाजातील प्रत्येकाने जागरूक व्हावे आणि सर्व गरजू वयोवृद्धांनी या एल्डर लाईनचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## कल्याण डोंबिवली महानगरपालिका कल्याण

दि.१७/१०/२०२५

### शुध्दिपत्रकाबाबत सुचना

कल्याण डोंबिवली महानगरपालिकेकडून दि.०३ ऑक्टोबर २०२५ रोजी प्रसिध्द केलेल्या जाहीर सूचनेविषयी या कार्यालयाने जा.क्र. कडोंमपा/निवड/मुका/११४ दि.१७/१०/२०२५ अन्वये शुध्दिपत्रक निर्गमित केले असून, सदरचे शुध्दिपत्रक मनपा वेबसाईट, मनपा कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्द करण्यात आले आहे, याबाबत नागरिकांनी कृपया नोंद घ्यावी.

जा. क्र.
कडोंमपा/जसंवि/मुका/५९९
दिनांक : १८/१०/२०२५

सही /-
(रमेश मिसाळ)
उपायुक्त (निवडणुक)
कल्याण डोंबिवली महानगरपालिका,

# खासगी वाहतूकदारांकडून ठाण्यात विशेष तपासणी मोहीम

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** दि.17 ऑक्टोबर 2025 पासून सुरु होणाऱ्या दिवाळी सणानिमित्त प्रवासी मोठ्या प्रमाणावर गावी येत व जात असतात. खाजगी वाहतूकदाराकडून प्रवाशांकडून जादा भाडे आकारण्याच्या प्रवृत्तीला आळा घालण्यासाठी व रस्ता सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून शासनाने विशेष तपासणी मोहिम हाती घेतली आहे. तरी प्रवाशांना प्रवास करताना येणाऱ्या अडचणींबाबत प्रवासी कार्यालयाच्या rto.04-mh@gov.in ईमेलवर आपल्या तक्रारी नोंदवू शकत आहेत. तसेच, खाजगी कंत्राटी वाहने ज्या ठिकाणाहून सुटतात त्या ठिकाणी पूर्ण बससाठी आकारावयाचे भाडे याबाबत प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे या कार्यालयाने दरतक्ता प्रदर्शित केला असल्याने त्या भाडे दरपत्रकानुसार प्रवाशांनी भाड्याची अदागी करावी, असे ठाणे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी रोहित काटकर यांनी नागरिकांना आवाहन केले आहे.

# कल्याण डोंबिवलीतील पहिल्या अत्याधुनिक सोलर हायमास्टचे लोकार्पण

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** सोलर सिटीच्या दिशेने कल्याण डोंबिवली महानगरपालिकेने आणखी एक पाऊल पुढे टाकले असून महापालिकेच्या विद्युत विभागाच्या पुढाकाराने कल्याण डोंबिवलीतील पहिल्या अत्याधुनिक सोलर हायमास्टचे लोकार्पण आज महापालिकेचे उपआयुक्त संजय जाधव यांच्या हस्ते आणि अतिरिक्त शहर अभियंता (विद्युत) प्रशांत भागवत, फिलिप्स इंडिया कंपनीचे नॅशनल हेड श्रीकांत फणसे यांच्या प्रमुख उपस्थितीत कल्याण पश्चिमे येथील गणपती चौकात करण्यात आले. विशेष म्हणजे विद्युत विभागाच्या पाठपुराव्याने 7.5 लाख किमतीची ही हायमास्ट फिटिंग फिलिप्स कंपनीकडून



मोफत उपलब्ध करून देण्यात आली आहे. इलेक्ट्रॉनिक क्षेत्रातील अग्रगण्य कंपनी असलेल्या फिलिप्स इंडियाकडून हा अत्याधुनिक सोलर हायमास्ट प्रायोगिक तत्त्वावर महापालिकेला उपलब्ध करून देण्यात आला आहे. रात्रीचे वेळी वीज पुरवठा खंडित झाल्यावर अथवा एखादा मोठा तांत्रिक

## लवकरच संपूर्ण महापालिका क्षेत्रात बसविणार सोलर हायमास्ट!

बिघाड झाल्यानंतर संपूर्ण शहर अंधारात बुडून जाते. त्यावेळी रस्त्यांवरून चालणाऱ्या नागरिकांच्या विशेषतः महिलांच्या सुरक्षेच्या प्रश्न ऐरणीवर येतो. या पार्श्वभूमीवर महापालिका क्षेत्रात बसविण्यात येणाऱ्या या सोलर हायमास्टमुळे संपूर्ण शहर अंधारमय होणार नाही अशी माहिती यावेळी विद्युत आणि यांत्रिकी विभागाचे अतिरिक्त शहर अभियंता प्रशांत भागवत यांनी दिली .नेहमीच्या सोलर हायमास्टपेक्षा या दिव्यांचा उजेडही अधिक जास्त असून बॅटरी एकदा पूर्ण चार्ज झाल्यावर दोन दिवस हे दिवे सुरू राहू शकतील अशी माहितीही त्यांनी यावेळी दिली.

कल्याण पश्चिमेत बसविण्यात आलेल्या या हायमास्टचा अभ्यास करून टप्प्याटप्प्याने संपूर्ण कल्याण डोंबिवलीमध्ये ते बसविण्यात येणार आहेत. ज्यामुळे नागरिकांची सुरक्षिततेसोबतच वीज बचतही होऊ शकणार आहे. या लोकार्पणसमयी विद्युत विभागाचे कार्यकारी अभियंता जितेंद्र शिंदे, उपकार्यकारी अभियंता भागवत पाटील आणि फिलिप्स इंडियाचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

# उंबर्डे फाटा येथे एक पेड गुरू के नाम








दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण :** जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्र महाराज यांच्या प्रेरणेने पर्यावरण रक्षणाचा संदेश देणाऱ्या वसुंधरा पायी दिंडीनिमित्त अखिल भारतीय हिंदू संग्राम सेना पेण तालुका तर्फे वृक्षारोपणाचा कार्यक्रम संपन्न झाला.

पर्यावरणात होणारे बदल, झाडे लावणे, त्यांचे संवर्धन करणे आणि प्लास्टिकचा वापर कमी करणे अशा पर्यावरण संदर्भात जनजागृती करत अखिल भारतीय हिंदू संग्राम सेना उत्तर रायगड पेण तालुका यांच्या वतीने उंबर्डे फाटा येथे १५० झाडांची लागवड करण्यातआली.यामध्ये असंख्य संग्राम सैनिकांनी सहभाग घेतला होता. गुरुमाऊलींच्या शिकवणी प्रमाणे "एक पेड गुरुके नाम" म्हणून हा उपक्रम करण्यात आला.

यावेळी अखिल भारतीय हिंदू संग्राम सेना उत्तर रायगडचे पेण तालुका कॅप्टन वसंत म्हात्रे, सह कॅप्टन नारायण म्हात्रे, तालुका महिला सह कॅप्टन मनीषा लेंडी, डोलवी मेजर नंदा पाटील, पेण मेजर संध्या झेमसे, कणे मेजर विनोद पाटील, गडब मेजर मीना कोठेकर, हमरापुर मेजर अशोक म्हात्रे, शिर्की मेजर मारुती पाटील, तळवली मेजर शिवतेज वाघमारे, मामा केवारी, भगवान नाईक, वडखळ मेजर चंद्रकांत गुजरे, भास्कर वाघमारे चंद्रकांत पवार, ईश्वर वाघमारे, माया ढुमणा, रामचंद्र पाटील, सावित्रीबाई धनवे आणि इतर मेजर उपस्थित होते.

# दिवाळीच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी सुरक्षेबाबत काळजी घ्यावी

## राज्य आपत्कालीन कार्य केंद्राचे नागरिकांना आवाहन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** दिपावली सण साजरा करताना आनंदाबरोबरच सुरक्षिततेची काळजी घेणे अत्यावश्यक आहे. दिवाळीच्या काळात घरगुती आग, फटाक्यांमुळे होणारे अपघात, शॉर्टसर्किट्स तसेच गर्दीच्या ठिकाणी गोंधळ यासारख्या घटनांची शक्यता असल्याने नागरिकांनी आवश्यक ती खबरदारी घेऊन दीपावली सण साजरा करावा, असे आवाहन राज्य आपत्कालीन कार्य केंद्राकडून करण्यात आले आहे.

दीपालीच्या कालावधीत दिवे, मेणबत्त्या आणि फटाके वापरताना घरगुती आगी लागण्याचा धोका वाढतो. फटाके फोडताना मुलांना भाजणे किंवा इतर इजा होऊ शकते. तसेच, विद्युत सजावट करताना निष्काळजीपणा केल्यास शॉर्टसर्किट्स होऊन आग लागण्याची शक्यता असते. सार्वजनिक ठिकाणी होणारी गर्दी आणि गोंधळ यामुळे अपघात होण्याचा धोका असल्याने नागरिकांनी आवश्यक खबरदारी घ्यावी. नागरिकांनी फटाके केवळ परवाना असलेल्या विक्रेत्यांकडूनच खरेदी करावेत. फटाके फोडताना सुताचे किंवा सूती कपडे वापरावेत; सैल किंवा सिंथेटिक कपडे टाळावेत. लहान मुलांना फटाक्यांपासून दूर ठेवावे आणि त्यांच्यावर लक्ष ठेवावे. फटाके फोडताना पाण्याची बादली, वाळू आणि प्राथमिक उपचार पेटी जवळ ठेवावी. घरात किंवा बंद जागेत फटाके फोडू नयेत. झोपताना किंवा घर सोडताना सर्व विद्युत दिवे बंद करावेत. एकाच सॉकेटमध्ये अनेक दिवे जोडणे टाळावे.

संभाव्य आपत्तीच्या अनुषंगाने राज्यातील सर्व जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणे, अग्निशमन दल, आरोग्य विभाग आणि पोलीस यंत्रणा सतर्क असून उच्च जोखमीच्या भागांमध्ये संयुक्त जनजागृती मोहीम राबवण्यात येत आहे. अग्निशमन दल आणि आपत्कालीन सेवा दलांना सज्ज राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

स्थानिक संस्था, गृहनिर्माण सोसायट्या, शाळा आणि स्वयंसेवी संस्था यांनी आग प्रतिबंधक जनजागृती कार्यक्रम राबवावेत. तसेच सोशल मीडिया, स्थानिक मंडळे आणि मंदिरांमधून प्रतिबंधात्मक सूचना प्रसारित कराव्यात, असे आवाहनही राज्य आपत्कालीन कार्य केंद्राने केले आहे.

आपत्कालीन क्रमांक - आग लागल्यास – १०१, वैद्यकीय आपत्कालीन सेवा – १०८

# सरकारने शेतकऱ्यांना सढळ हस्ते मदत करा

## राष्ट्रवादी शरद पवार गटाची मागणी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** अतिवृष्टी आणि पुराच्या संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांच्या तसेच पूरग्रस्त जनतेच्या वेदनांकडे राज्य सरकारने दुर्लक्ष केलं असून सरकारच्या खोट्या आश्वासनांमुळे आणि धोरणांमुळे यंदाची दिवाळी बळीराजासाठी दुःखद व काळी ठरली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी, त्यांच्या न्यायासाठी आणि शासनाच्या उदासीनतेविरुद्ध आवाज उठवण्यासाठी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरदचंद्र पवार गटाच्या कल्याण-डोंबिवली जिल्हा तर्फे आज कल्याण तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले. यावेळी राष्ट्रवादी विमुक्त भटक्या जमाती सेलचे जिल्हा अध्यक्ष दिनेश परदेशी, राष्ट्रवादी संघटक सचिव वल्ली राजन आणि सामाजिक कार्यकर्ता तोशेस शुक्ला उपस्थित होते.

राज्यात अतीवृष्टीमुळे चौफेर नुकसान झालेला असून कधी नव्हे असे नैसर्गिक



यंदाची दिवाळी बळीराजासाठी दुःखद व काळी ठरली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी, त्यांच्या न्यायासाठी आणि शासनाच्या उदासीनतेविरुद्ध आवाज उठवण्यासाठी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरदचंद्र पवार गटाच्या कल्याण-डोंबिवली जिल्हा तर्फे आज कल्याण तहसीलदार यांना निवेदन

संकट आल्यामुळे राज्यातील बळीराजा पूर्णपणे उध्वस्त झालेला शेतकऱ्याची काळी दिवाळी साजरी होत आहे. तरी सरकारने संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना हेक्टरी र. रु. ५० हजार व जमीन खरडून गेलेल्या शेतकऱ्यांना किमान ४ लाख ५० हजार हेक्टरी, विहिरीमध्ये गाळ गेलेल्या शेतकऱ्यांना किमान र. रु १ लाख ५० हजार तसेच जनावरे गाय, म्हैस व बैल करीता किमान र. रु १ लाख महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची सरसकट कर्ज माफी करावी. ओला दुष्काळ जाहीर करावा, विद्यार्थ्यांची शालेय फी माफ करून शेतकऱ्यांना पीक विम्याच्या पैशाची व्यवस्थित कंपनी कडून वितरण व्हावे. राज्यातील बळीराजाच्या सरळ हाताने सरकारने मदत करावी अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.

# सरदार@150 एकता अभियानात युवकांनी मोठ्या प्रमाणात सहभागी व्हावे

## - क्रीडा मंत्री माणिकराव कोकाटे

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** भारताचे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त केंद्र सरकारच्यावतीने 'सरदार@१५० युनिटी मार्च' या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमाअंतर्गत राष्ट्रीय पदयात्रेचा शुभारंभ २६ नोव्हेंबर रोजी तर राज्यात या मोहिमेचा शुभारंभ ३१ ऑक्टोबर रोजी होणार आहे. या मोहिमेत राज्यातील जास्तीत - जास्त युवकांनी सहभागी व्हावे असे आवाहन क्रीडा व युवक कल्याण मंत्री ॲड माणिकराव कोकाटे यांनी मंत्रालयात आयोजित पत्रकार परिषदेत केले.

**सरदार@150 एकता मोहिमेचा भव्य शुभारंभ**

या मोहिमेअंतर्गत "विकसित भारत पदयात्रा" उपक्रमाद्वारे युवकांमध्ये देशभक्ती, एकता आणि नागरी जबाबदारी जाणीव, राष्ट्रीय अभिमानाची भावना दृढ करणे, नागरी सहभाग वाढविणे आणि युवकांमध्ये एकतेची व देशभक्तीची भावना रुजविण्यात येणार आहे. राष्ट्रीय स्तराबरोबरच राज्यातही सरदार@150 एकता मार्चचे आयोजन करण्यात येत आहे. लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या 150 व्या जयंतीनिमित्त त्यांच्या राष्ट्रीय एकतेतील योगदानाचे स्मरण ठेवण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात येत आहे. याद्वारे भारताचा सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक उत्कर्ष साधणे व एकात्मता वाढवणे यावर भर असणार आहे. या मोहिमेत युवकांना सहभागी करून राष्ट्रनिर्माणात त्यांना सक्रियपणे सहभागी करणे, देशभक्ती आणि नागरी जबाबदारीची भावना जागविणे ही मुख्य प्रेरणा आहे. राज्यात जिल्हा स्तरावर पदयात्रा आयोजित करण्यात येणार आहेत.

**जिल्हा स्तरावरील पदयात्रा (31 ऑक्टोबर – 15 नोव्हेंबर 2025)**

प्रत्येक जिल्ह्यात तीन दिवसांच्या कालावधीत आठ ते दहा कि.मी. पदयात्रा आयोजित करण्यात येईल. पदयात्रेदरम्यान सरदार पटेल यांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण करून, आत्मनिर्भर भारताची शपथ घेण्यात येईल. सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. महाराष्ट्रात सर्व जिल्ह्यामध्ये जिल्हा प्रशासन, क्रीडा विभाग, माय भारत, एनएसएस, एनसीसी तसेच स्थानिक प्रशासन जिल्हास्तरीय पदयात्रा आयोजित करणार आहेत. क्रीडा विभाग या पदयात्रेच्या आयोजनाकरिता आयोजक म्हणून असणार आहे.

**निबंध आणि वादविवाद स्पर्धा :** सरदार पटेल यांच्या जीवनावर चर्चासत्रे आणि पथनाट्ये (नाटक), नशा मुक्ती भारत प्रतिज्ञा, योग आणि आरोग्य शिबिरे, स्वच्छता मोहिमांचा समावेश, महिला कल्याण शिबिरे, योग आणि आरोग्य शिबिरे, स्वदेशी उत्पादनांना चालना देणारे अभियान "गर्व से स्वदेशी" प्रतिज्ञा, शाळा, महाविद्यालयांमध्ये निबंध, वादविवाद, परिसंवाद, पथनाट्ये, स्थानिक कलांवर आधारित कार्यक्रम-संगीत, नृत्य, लोकनृत्य इत्यादी, संस्था स्वदेशी मेळावे, आत्मनिर्भर भारत प्रतिज्ञा इत्यादी उपक्रम राबविले जाणार आहे.

या उपक्रमासाठी सर्व नोंदणी MY Bharat Portal वर ऑनलाइन पद्धतीने करण्यात येत आहे. https://mybharat.gov.in/pages/unity_march देशातील सर्व युवकांना या ऐतिहासिक आणि प्रेरणादायी "सरदार@150 एकता मोहिमेत" सहभागी होण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

अधिक माहितीसाठी युवक व्यवहार आणि क्रीडा मंत्रालय भारत सरकार यांच्या https://mybharat.gov.in या संकेतस्थळावर भेट द्यावी, असे आवाहन क्रीडा विभागामार्फत करण्यात आले आहे.



# क्रीडा धोरणात प्राधान्याने 'एक खेळ एक संघटनेचा' समावेश करा -मंत्री ॲड.माणिकराव कोकाटे

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई** : जागतिक स्तरावर राष्ट्राची उत्कृष्टता साध्य करण्यासाठी, क्रीडा व आर्थिक आणि सामाजिक विकास तसेच क्रीडा लोकचळवळ वाढविण्याच्या दृष्टीने केंद्र सरकारने खेलो भारत नीति 2025 धोरण तयार केले आहे. या धोरणाच्या धर्तीवर राज्य क्रीडा धोरण तयार करण्यात यावे, यासाठी समिती स्थापन करण्यासाठी प्रस्ताव पाठविण्याचे निर्देश क्रीडा व युवक कल्याण मंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांनी दिले. यामध्ये एक खेळ एक संघटनेचा प्राधान्याने समावेश करावा असेही त्यांनी स्पष्ट केले.

राज्याचे क्रीडा धोरण तयार करण्याच्या प्रक्रियेबाबत आढावा घेण्यासाठी मंत्रालयात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आमदार संजय बनसोडे, आमदार विजयसिंह पंडीत, आयुक्त शीतल तेली, उपसचिव सुनील पांढरे आणि स्काऊट गाईडचे प्रतिनिधी उपस्थित होते.क्रीडा मंत्री ॲड.माणिकराव कोकाटे म्हणाले, क्रीडा धोरणात प्राथमिक व माध्यमिक शालेय शिक्षणात क्रीडा उपक्रमांचा समावेश, शालेय व जिल्हास्तरीय क्रीडा प्रतियोगितांना प्रोत्साहन देणे, राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 च्या धर्तीवर बालपणापासून शारीरिक शिक्षणाची गोडी निर्माण व्हावी यासाठी उपक्रम राबविणे, क्रीडा स्पर्धा आयोजित करणे, क्रीडा प्रोत्साहन संस्थांची निर्मिती करणे आदि विषयांचा समावेश करावा. तसेच, आमदार खेळाडू, नैपुण्य प्राप्त खेळाडू, प्रशिक्षक, संघटनांचे प्रतिनिधी, शासकीय अधिकारी, पत्रकार, क्रीडा तज्ज्ञ यांचा क्रीडा धोरण समितीमध्ये समावेश करावा. तसेच, खेळाडूंचे याबाबत ऑनलाईन पद्धतीने मागविण्यात याव्यात, अशी सूचनाही मंत्री ॲड. कोकाटे यांनी केली.

# वाचत राहाल, तर टिकून राहाल, अन् पुढे जाल - प्रा.पल्लवी ढाले

## सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने वाचन प्रेरणा दिवस साजरा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : मुद्रित साधने कमी किमतीत एका वेळी ज्ञानाच्या अनेक कक्षा रुंदावण्याचे काम करतात म्हणून विद्यार्थी दशेत किमान एका तरी वर्तमानपत्राचे वाचन करणे आवश्यक आहे. कारण सध्याच्या ए. आय च्या युगात ज्ञानसंपदेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. म्हणुन वाचत रहाल तर टिकून रहाल अन पुढे जाल असा मोलाचा सल्ला बिर्ला महाविद्यालयाच्या प्रा. पल्लवी ढाले यांनी प्रमुख पाहुणे सार्वजनिक वाचनालय कल्याण, कल्याण डोंबिवली महानगरपालिका पु.बा.भावे व्याख्यानमालेअंतर्गत डॉ.ए.पी. जे.अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस म्हणजेच वाचन प्रेरणा दिनाच्या कार्यक्रम प्रसंगी दिला.

शरीराला जशी पोषणमुल्यांची आवश्यकता असते त्याचप्रमाणे मेंदूला पुस्तकरूपी खुराक वाचनातून पुरविणे आवश्यक आहे म्हणून वाचलेले विचार वाचावेत असे सचिव, मराठी भाषा प्रमुख किशोर शेळके यांनी प्रमुख पाहुणे म्हणून प्रतिपादन केले. प्रसंगी व्यासपीठावर वाचनालयाचे अध्यक्ष मिलिंद कुलकर्णी व कार्यकारिणी सदस्या तथा जनसंपर्क अधिकारी माधवी पोफळे उपस्थित होत्या. अनेक दशकांपासून अविरत वाचन करणाऱ्या संध्या जयवंत, दीपक कापुरे, वैभव जाधव अशा अनेक वाचकांचा उत्कृष्ट वाचक म्हणून सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाच्या दुसऱ्या सत्रात "शांतता, कल्याणकर वाचत आहेत" या उपक्रमातून डॉ.ए.पी. जे.अब्दुल कलाम यांच्या स्मृतींना वाचनालयाच्या वतीने मानवंदना देण्याचा एक छोटासा प्रयत्न आहे असे प्रतिपादन सरचिटणीस भिकू बारस्कर यांनी आभार प्रदर्शन प्रसंगी केले. वाचनालयाचा वाचकवर्ग, विद्यार्थी वर्ग, शिक्षकवर्ग, ग्रंथपाल व ग्रंथसेविका यांनी या उपक्रमात सहभाग नोंदविला. अत्यंत शिस्तबद्ध व उत्कृष्ट नियोजनातून सदर कार्यक्रम उत्साहात पार पडला.

# आरसीएफ कंपनी विरोधात आमदार महेंद्रशेठ दळवी साखळी उपोषणात बसणार

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण** : आरसीएफ व्यवस्थापन प्रकल्पग्रस्तांना न्याय देत नसल्याने आरसीएफ कंपनी विरोधात तीव्र आणि उग्र आंदोलन 17 ऑक्टोबर रोजी छेडण्यात येणार होते. मात्र दिवाळी सण लक्षात घेऊन शिवसेनेचे कार्यसम्राट आमदार महेंद्रशेठ दळवी यांनी आरसीएफ विरोधात सुरू असलेल्या साखळी उपोषणात सहभागी होण्याचा निर्णय घेतला आहे. अशी माहिती शिवसेनेचे जिल्हाप्रमुख राजाभाई केणी यांनी दिली आहे.

अलिबाग तालुक्यातील थळ येथे आरसीएफ कंपनी आहे. या कंपनीने नेहमी स्थानिकांवर, भूमिपुत्रांवर ,प्रकल्पग्रस्तांवर अन्याय केला. त्यामुळे प्रकल्पग्रस्तांना न्याय देण्यासाठी शिवसेनेचे कार्यसम्राट आमदार महेंद्रशेठ दळवी यांनी आरसीएफ विरोधात आंदोलनाची हाक दिली. त्यानुसार आरसीएफ विरोधात जोरदार आंदोलन स्थानिकांनी सुरू केले आहे. या आंदोलनाचा एक भाग म्हणून आरसीएफ कंपनीला जाग आणण्यासासाठी आमदार महेंद्रशेठ दळवी यांनी दिवाळीचा सण लक्षात घेऊन आंदोलन शांततामय मार्गाने करण्याचा निर्णय घेऊन सुरू असलेल्या साखळी उपोषणात स्वतः सहभागी होण्याचा निर्धार केला आहे. त्यानुसार 18 ऑक्टोबर रोजी साखळी उपोषणात आमदार महेंद्रशेठ दळवी सहभागी होत आहेत. आमदार स्वतः उपोषणाला बसणार आहेत. त्यामुळे आरसीएफविरोधातील आंदोलनाची आता तीव्रता वाढली आहे.

# जीवनदीप महाविद्यालयात दिवाळी उत्साहात साजरी

## स्वच्छता अभियान आणि शिवरायांचा किल्ला ठरला आकर्षणाचा केंद्रबिंदू

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**खर्डी** : जीवनदीप शैक्षणिक संस्था, कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, खर्डी येथे दिवाळीचा सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने महाविद्यालयात स्वच्छता अभियान राबविण्यात आले तसेच विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य मातीचा किल्ला उभारून सर्वांचे लक्ष वेधून घेतले.



दिवाळी म्हणजे प्रकाशाचा, आनंदाचा आणि ऐक्याचा सण. या सणाचे औचित्य साधून राष्ट्रीय सेवा योजना (NSS) विभागानी "स्वच्छता हीच सेवा" या घोषवाक्याखाली महाविद्यालयीन परिसरात स्वच्छता उपक्रम राबविण्यात आला. स्वयंसेवक विद्यार्थ्यांनी अंगण, आणि बागेतील परिसर स्वच्छ करून सुंदररित्या सजविला.

यानंतर विद्यार्थ्यांनी परंपरागत पद्धतीने मातीचा शिवरायांचा किल्ला तयार केला. माती, दगड, गवत, रंग आणि सजावटीच्या वस्तूंचा वापर करून बनविलेल्या या किल्ल्याने दिवाळीला ऐतिहासिक आणि देशभक्तीचा साज चढविला. किल्ल्यात बुरुज, तोफा, दरवाजा आणि भगवा झेंडा यांची सुंदर मांडणी करण्यात आली होती. संध्याकाळी दीप प्रज्वलन करून परिसर उजळून निघाला.

हा उपक्रम संस्थेचे अध्यक्ष मा. श्री.रवींद्र घोडविंदे यांच्या प्रेरणेने करण्यात आला. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य मा. श्री. के. आर. कळकटे सर, NSS कार्यक्रम अधिकारी, प्रा.राहुल सोनावणे आणि प्रा. रसिका सकपाळ तसेच विविध विभागांचे प्राध्यापक उपस्थित होते. प्राचार्यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करताना सांगितले, "दिवाळीचा सण आनंदासोबत स्वच्छतेचा आणि पर्यावरणपूरकतेचा संदेश देतो. विद्यार्थ्यांनी दाखविलेली एकजूट आणि सर्जनशीलता प्रेरणादायी आहे." कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी रंगोळी, दीप सजावट आणि पारंपरिक पोशाख प्रदर्शनात सहभाग घेतला. महाविद्यालय परिसरात दिवाळीचा उत्साह, ऐक्य आणि देशभक्तीचा भाव ओसंडून वाहत होता.

# भांडण सोडविणाऱ्या माजी नगरसेवकावर हल्ला

## हल्ल्यात शिवसेना माजी नगरसेवक उमेश बोरगावकर जखमी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : शिवसेना शिंदे गटाच्या माजी नगरसेवकाच्या गाडीवर हल्ला झाल्याची घटना शुक्रवारी रात्री घडली आहे. कार्यालयासमोर भांडण सोडवुन जखमी इसमाला रुग्णालयात नेत असताना अज्ञात इसमांकडून हल्ला करण्यात आला. या हल्ल्यात माजी नगरसेवक उमेश बोरगावकर यांच्यासह ज्ञानेश्वर सपाट, ओंकार सपाट दोघे जखमी झाले आहेत. या प्रकरणी पोलीस तपास सुरु आहे.

कल्याण पश्चिमेतील बेतूरकर पाडा परिसरात माजी नगरसेवक उमेश बोरगावकर यांचे जनसंपर्क कार्यालय आहे. या कार्यालयासमोर असलेल्या गौरी संकुल या इमारतीच्या परिसरात ज्ञानेश्वर सपाट, ओंकार सपाट यांचा काही लोकांसोबत वाद



झाला, मारझोड झाली. हे बघताच बोरगावकर यांनी मध्यस्थी करत भांडण सोडवले. या भांडणात ओंकार याच्या डोक्याला मार लागल्याने त्याला रुक्मिणीबाई रुग्णालयात नेण्यात आले. यानंतर रुग्णालयातून बाहेर पडत असतांना बोरगावर यांच्या गाडीची तोडफोड करत हल्ला करण्यात आला. यामध्ये बोरगावकर देखील जखमी झाले असून या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करत आहेत.

# 'विचारधन - गाथा संघर्षाच्या' आय. टी. जिनियसचा कार्यक्रम उत्साहात

## परिसरातील यशस्वी युवांच्या हस्ते विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वितरण

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**वाडा** : तालुक्यातील नामांकित संगणक प्रशिक्षण संस्था आय. टी. जिनियस मार्फत 'विचारधन - गाथा संघर्षाच्या' व संगणक प्रमाणपत्र वितरण' या कार्यक्रमाचे आयोजन वाड्यात करण्यात आले होते. बऱ्याचदा ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना 10 वी 12 वी नंतर कोणती करियर क्षेत्रे निवडू शकतो ह्याबाबत फारशी माहिती नसते. ह्या कार्यक्रमात विविध कॉलेजेस, आय. टी. आय. इत्यादी शैक्षणिक क्षेत्रातले प्रतिनिधी बोलावून विद्यार्थ्यांना भविष्यातील विविध करिअर क्षेत्रांची माहिती देण्यात



आली. कार्यक्रमाला तालुक्यातील, परिसरातील डॉक्टर, वकील, शिक्षक, इंजिनियर, उद्योग, व्यवसाय इत्यादी विविध क्षेत्रात यश मिळविलेल्या व्यक्तिमत्त्वांना निमंत्रित करून विद्यार्थ्यांना त्यांच्या हस्ते प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. त्या सर्वांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत आपण केलेल्या संघर्षाची गाथा विद्यार्थ्यांसामोर ठेवली. सामान्य कुटुंबातील व्यक्तीमत्व, जे आपल्यातलेच एक आहेत, ज्यांनी संघर्षातून हे सर्व साध्य केलं हे पाहून विद्यार्थ्यांनी त्यातून प्रेरणा घ्यावी हा कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता. 10 वी 12 वी हे वय बिघडण्याचं नसून आयुष्याला आकार देण्याचं असल्याने विद्यार्थ्यांसाठी भविष्याच्या दृष्टीने आयोजित कार्यक्रमाचे पालकांनी कौतुक केले. ह्यावेळी सुमारे दीडशे विद्यार्थ्यांना संगणक अभ्यासक्रम प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. वस्तूच्या वाटपापेक्षा विचारांचं वाटप महत्वाचं असं प्रतिपादन संस्थेचे संचालक कल्पेश ठाणगे ह्यांनी केले. शेवटी राष्ट्रगीताने कार्यक्रमाचा समारोप झाला.

# आधारवाडी कारागृहात 'दिवाळी पहाट'



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : आधारवाडी कारागृहात शनिवारी 'दिवाळी पहाट' या संगीतमय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. ठाण्यातील सूर ताल ग्रुपने भावगीत, भक्तिगीत, देशभक्तीपर तसेच मराठी आणि हिंदी गीतांचे सादरीकरण करून उपस्थितांचे मनोरंजन केले. प्रमुख पाहुणे म्हणून उल्हासनगरचे सहाय्यक पोलिस आयुक्त अमोल कोळी उपस्थित होते. त्यांनीही दोन गाणी सादर करून बंदिवानांचा उत्साह वाढविला.

अपर पोलिस महासंचालक डॉ. सुहास वारके, विशेष कारागृह महानिरीक्षक व कारागृह उपमहानिरीक्षक (दक्षिण विभाग, मुंबई) योगेश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली कारागृह अधीक्षक प्रदीप जगताप यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले. कारागृह विभाग, सेवाधाम सामाजिक संस्था, ठाणे आणि विविध स्वयंसेवी संस्थांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम पार पडला.कारागृहात सध्या नर्सिंग कोर्स, संगणक प्रशिक्षण तसेच आर्ट ऑफ लिव्हिंगच्या माध्यमातून कौशल्यविकास प्रशिक्षण सुरू आहे. दीपावली सणाचे औचित्य साधून महिला बंदिवानांनी रांगोळ्या, आकाशकंदील, कानातील व गळ्यातील दागिने अशा विविध वस्तू तयार केल्या. या वस्तूंपैकी सुमारे चार हजार किमतीच्या वस्तू विकल्या गेल्या असून ती संपूर्ण रक्कम महिला बंदिवानांना देण्यात येणार आहे. तसेच, महिला बालकल्याण समितीच्या राणी बैसाने यांनी सहेली संस्थेच्या मदतीने शिवणकामासाठी शिलाई मशीन उपलब्ध करून दिल्या आहेत. तर प्रिझन मिनिस्ट्री, मुंबई ही संस्था महिला बंदिवानांना फॅशन डिझाइनचे प्रशिक्षण देत असल्याची माहिती अधीक्षक जगताप यांनी दिली. या कार्यक्रमाला सेवाधाम, प्रयास संस्था, प्रिझम मिशनरी, फन क्लब, रोटरी क्लब ऑफ कल्याण डायमंड, सहेली संस्था आणि बालकल्याण समिती, ठाणे या संस्थांचे प्रतिनिधी तसेच कारागृहातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उमाकांत चौधरी यांनी केले.

# भिवंडी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या स्वीकृत संचालक पदी मनोहर ठाकरे यांची निवड



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पडघा** : भिवंडी तालुक्यातील कळंबोली( पडघा) येथील भुमीपुत्र व शिवसेनेचे भिवंडी ग्रामीण विधानसभा संघटक मनोहर ठाकरे यांची भिवंडी कृषी उत्पन्न बाजार समिती स्वीकृत संचालक म्हणून निवड करण्यात आल्याने सर्वत्र त्यांचे अभिनंदन होत आहे.

पडघा परीसरात सर्वानां सुपरिचीत असलेले तालुक्यातील डोहळे गृप ग्रामपंचायतीचे माजी सरपंच, शेतकरी सहकारी भातगिरणी मर्यादित पडघा या संस्थेचे माजी उपसभापती व विद्यमान संचालक, कोंशीबी सेवा सहकारी सोसायटीचे माजी सभापती व विद्यमान संचालक अशी पदे मनोहर ठाकरे यांनी भुषविली असुन सहकार क्षेत्रातील त्यांचा असलेला गाढा अभ्यास लक्षात घेता कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सचीन पाटील उपसभापती मनेष म्हात्रे सचीव प्रवीण गायकवाड यांच्या उपस्थीतीत व विद्यमान संचालक मंडळाच्या मान्यतेने मनोहर गजानन ठाकरे यांची स्वीकृत संचालक पदी गुरूवारी निवड करण्यात आली यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक प्रकाश भोईर, जयदास भगत आदी संचालक उपस्थीत होते. ठाकरे यांची निवड झाल्याचे समजतात शिवसेना नेते प्रकाश पाटील, कुणबी सेना तालुका अध्यक्ष संतोष कथोरे, माजी सरपंच व शिवसेना जिल्हा परिषद गट पडघा सचीव शंशाक तांबोळी सह परिसरातील पदाधिकारी, नागरीक, कार्यकर्त्यांनी त्यांचे अभिनंदन केले.

# ठाण्यात रंगणार कोकण महोत्सव | महोत्सवातून मिळणार कोकण विकासाला गती

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : कोकण विकासाला गती देण्यासाठी हा महोत्सव मोलाचा ठरणार आहे. गेल्या ८०० वर्षांपासून दशावतार ही कोकणची लोकसंस्कृती, परंपरा आणि भाषा आपल्या सोबत आहे. आपलं आणि कोकणच घनिष्ठ, प्रेमाचं नातं आहे. सर्व जगात कोकण सुंदर आहे. शेती, पर्यटन, मत्स आणि निसर्ग अश्या अनेक क्षेत्रात आपल कोकण जागतिक कीर्तीचे व्हावं यासाठी उपमुखमंत्री एकनाथजी शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सिंधुदुर्ग सामाजिक मंडळ ठाणे आणि शिवसेना गटनेते व मा. नगरसेवक दिलीप बारटक्के यांच्या संयुक्त विद्यमाने कोपरी पांचपाखाडी विधानसभा मतदारसंघामध्ये दि. २६ ऑक्टोबर ते २ नोव्हेंबर 2025 रोजी दररोज सायंकाळी ५. ते रात्री १०. या वेळेत ठामपा. शाळा क्र. १२० चे पटांगण, स्वातंत्र्यवीर सावरकरनगर ठाणे येथे कोकण महोत्सव २०२५ आयोजन करण्यात आले आहे.

कोकण महोत्सवाचे यंदाचे हे १८ वे वर्ष आहे. कोकण महोत्सवात या वेळी कोकणातील प्रसिध्द दशावतार नाट्य मंडळींची 5 पारंपारिक दशावतार आणि ट्रिकसिनयुक्त नाटके, भजनाची डबलबारी, महिलांसाठी खास खेळ पैठणीचा, महाराष्ट्राची लोकधारा आणि नृत्ये, कोकणरत्न पुरस्कार, गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार आणि मुलांसाठी फनफेअर असणार आहे. कोकण महोत्सवाचे मुख्य आकर्षण म्हणजे यावर्षी ता.राजापूर जि.रत्नागिरी येथील बांदिवडे गावातील श्री भराडी देवी मंदिराची प्रतिकृती साकारणार आहे. तसेच विविध प्रकारचे खाद्यस्टॉल असणार आहेत. यामध्ये कोकणचा अस्सल चवदार झणझणीत म्हावरा, मालवणी मसालो, स्वादिष्ट खडखडे लाडू, मालवणी खाजा, कुळदाची पिठी, सुकी मच्छी, मासे,कोकम, काजू, आंबा फणस वडी, पोहे जगप्रसिद्ध "मुगड्याची झाडू" सूप, रवळी, सावंतवाडी खेळणी ,गंजिफा, साहित्याचा आस्वाद घेण्यासाठी विविध विषयांवरील पुस्तक स्टॉल असणार आहे.

येत्या 26 ऑक्टोबरला मोठ्या संख्येने या, कोकण महोत्सवाचा आस्वाद घ्या, कोकण आणि कोकणवासीयांचा विकास एकत्रच करुया, कोकणच्या आर्थिक आणि शाश्वत विकासासाठी महोत्सवाक यवकच होया. येवा कोकण आपलाच आसा. असे आवाहन सिंधुदुर्ग सामाजिक मंडळ ठाणे व शिवसेना गट नेते व मा.नगरसेवक दिलीप बारटक्के यांनी केले आहे.

# संच मान्यतेसाठी 7 नोव्हेंबरची पटसंख्या ग्राहय धरावी - राकेश तोमर

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : 2025-26 च्या संच मान्यतेसाठी दि. 20 आक्टोबर 2025 रोजी पटसंख्या ग्राहय धरावी असा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. परंतु उत्तर भारतातून रोजगारासाठी महाराष्ट्रात आलेल्या मजदूरांच्या अधिकांश मुलांचे आधार कार्ड त्यांच्या मुळ गावी आहेत. दि.18 आक्टोबर 2025 रोजी पासून दिवाळीची सुट्टी सुरु होत आहे. या सुट्टीमध्ये विद्यार्थी, पालक आपले मुळ गावी जात आसतात. मुळ गावी जाऊन परत येताना मुळ आधार कार्ड घेऊन आल्यावर शाळेत जमा करतील. त्यामुळे विद्यार्थी पालकांच्या समस्या लक्षात घेऊन विद्यार्थी व शिक्षकांचे भविष्यासाठी सन 2025-26 चे संचमान्यतेसाठी 07 नोहेंबर 2025 पर्यंतचा कालावधी ग्राह्य धरावा अशी मागणी शिक्षण शक्ती संघटनेचे संस्थापक अध्यक्ष कुँवर राकेश राजाबेटी गंभीर सिंह तोमर यांनी मुख्यमंत्री व शिक्षणमंत्री यांचेकडे निवेदनाद्वारे केली आहे.

news.thanejeevandeep@gmail.com
दैनिक ठाणे जीवनदीप
WhatsApp Channels
महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक
दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
मुंबई ■ नवी मुंबई ■ ठाणे ■ पालघर ■ रायगड
9619188558 / 9082664781
www.jeevandeepvarta.com/
आपलं हक्काचं दैनिक, दररोज वाचा.

जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!
१ बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) कालावधी १ वर्ष
२ पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) कालावधी १ वर्ष
३ जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) कालावधी १ वर्ष
४ डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) कालावधी २ वर्ष
५ सिक्युरिटी ॲण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४११११२४) कालावधी ६ महिने
पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे
Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558

*Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,*
*Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.*
*Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com * RNI NO : MAHMAR/2016/72091 * Postal Reg. No. THC/256/2022-2024*